**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४.**

इयत्ता १०वी//१२ वी ॲडव्हाईस नोट नोंदणी शुल्काकरिता

दिनांक / /२०१९

शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतांक क्रमांक ,☐☐☐☐☐☐☐☐

प्रति,

मा. विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

महोदय,

आमच्या शाळेचे/कनिष्ठ महाविद्यालयाचे **सन २०१९-२०** या शैक्षणिक वर्षाचे नोंदणी शुल्क रु. ...........( अक्षरी रुपये .....................................................फक्त ) खाली नमूद केल्याप्रमाणे आपल्या कार्यालयाकडे पाठविण्यात येत आहे.

१) विद्यार्थी संख्या

२) चलन क्रमांक .......................... दिनांक ........................

३) बँकेचे नाव व शाखा ..................................................रक्कम रुपये ..........................

४) विलंब शुल्क ( दंड )

अ) दिनांक ११ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट रु. २००/-

ब) दिनांक ०१ सप्टेबर ते ३० सप्टेबर रु. ३००/-

क) दि. ०१ ऑक्टोबर नंतर नियमित विद्यार्थ्यांचे आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखेपर्यंत रु.५००/-

आपला विश्वासू,

दिनांक

प्राचार्यांची स्वाक्षरी
(सुस्पष्ट शिक्क्यासह )

शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतांक क्रमांक ,☐☐☐☐☐☐☐☐

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४.**

**इ. १० वी व इ. १२ वी सन २०१९-२०** साठीचे वार्षिक नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वार्षिक वर्गणी बाबतचे परिपत्रक

परिपत्रक क्र. कोविमं/लेखा / नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वर्गणी/ 536 दिनांक ०७ जून २०१९.

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा / सांगली / कोल्हापूर.

या कार्यालयाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रमुखांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, **शैक्षणिक वर्ष २०१९-२०** या वर्षासाठी नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वार्षिक वर्गणी खालीलप्रमाणे आहे

| अ.क्र. | तपशील | रक्कम रुपये | शिक्षण संक्रमण वार्षिक वर्गणी |
|---|---|---|---|
| १) | **इ. १० वी साठी ००१ ते १०० विद्यार्थी**<br>**१०१ ते पुढील प्रत्येक १०० विद्यार्थ्यामागे** | रु. १०००/-<br>रु. २००/- | रु. २००/- |
| २) | **इ. १२ वी साठी ००१ ते १०० विद्यार्थी**<br>**१०१ ते पुढील प्रत्येक १०० विद्यार्थ्यामागे** | रु. १०००/-<br>रु. ४००/- | रु. २००/- |

उपरोक्तप्रमाणे नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वर्गणी विभागीय मंडळाकडून देण्यात आलेल्या चलनाव्दारे जमा करताना सोबतची इ. १० वी व इ. १२ वी ॲडव्हाईस नोट या कार्यालयाच्या शाखा लेखाकडे पाठविणे आवशक आहे. तसेच नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वार्षिक वर्गणी रक्कम स्वतंत्र चलनाव्दारे बँकेत जमा करण्यात यावी. शिक्षण संक्रमण वार्षिक वर्गणी संदर्भातील राज्य मंडळाचे निवेदन या परिपत्रकासोबत जोडण्यात आले आहे.

**दिनांक १० ऑगस्ट २०१९ नंतर पाठविल्या जाणा-या नोंदणी शुल्कासाठी शाळांना / महाविद्यालयांना खालीलप्रमाणे दंडासहीत नोंदणी शुल्क आकारण्यात येईल यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात आलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

१) दिनांक ११ऑगस्ट ते दिनांक ३१ ऑगस्ट — रु. २००/-
२) दिनांक १ सप्टेंबर ते दिनांक ३० सप्टेंबर — रु. ३००/-
३) दिनांक १ ऑक्टोबर नंतर नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखेपर्यंत — रु. ५००/-

सदर नोंदणी शुल्काची रक्कम आपल्या नजिकच्या बँक ऑफ इंडिया शाखेत चलनाने भरावी. त्या चलनातील रिसीट कोड क्र. ०५ (इ. १० वी साठी) व रिसीट कोड क्र. ६२ (इ. १२ वी साठी) अशी ☐ खुण करुन अचूक रक्कम अंकी व अक्षरी भरावी. नोंदणी शुल्काची ( Copy for Divisional Board ) चलन व ॲडव्हाईस नोट आपल्या प्रतिनिधीमार्फत कार्यालयाकडे त्वरीत जमा करावी.कोणत्याही परिस्थितीत डी. डी. स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

तसेच नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वार्षिक वर्गणी या पुढे प्रतिवर्षी १० ऑगस्ट पूर्वी भरावी. याबाबत या विभागीय मंडळाकडून परिपत्रक पाठविले जाणार नाही असे दि. ०२ जून २०१२ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे. तरीही पुन:श्च या बाबी या परिपत्रकाव्दारे आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे याची नोंद घ्यावी. नोंदणी शुल्क किंवा विलंब शुल्क किंवा शिक्षण संक्रमण वर्गणीमध्ये काही बदल झाल्यास त्याबाबत मंडळाकडून वेळोवेळी कळविण्यात येईल. तरी त्याप्रमाणे **आपल्या माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयाचे नोंदणी शुल्क / शिक्षण संक्रमण वर्गणी मंडळाच्या परिपत्रकाची वाट न पाहता प्रतिवर्षी न चुकता दिनांक १० ऑगस्टपूर्वी भरावी.**

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

**मागील बाजूस नमुने दिले आहेत त्या नमुन्यात माहिती पाठवावी.**